पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक: ०८/०४/२०२०**

## किष्टापूर नाल्याच्या बांधकामावरील वाहनांच्या जाळपोळीचा पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून निषेध

### ❖नक्षलवादाला न जुमानता पुन्हा काम सुरु करण्याची ग्रामस्थांची मागणी

उपविभाग जिमलगट्टा हद्दीतील मौजा किष्टापूर नाल्यावरील पुलाचे बांधकाम करणाऱ्या वाहनांची नक्षलवादयांनी आज जाळपोळ केली. या घटनेचा तीव्र निषेध या भागातील नागरिकांनी केला असून सर्वसामान्य आदिवासी बांधवांच्या सुख-दु:खाशी नक्षलवादयांना काहीही देणे घेणे नसल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाल्याचे म्हटले आहे. किष्टापूर नाल्यावरील या पुलाचे बांधकाम देचलीपेठा पंचक्रोशीतील १६ गावातील नागरिकांच्या वर्षानुवर्षे मागणीनुसार सुरु करण्यात आले होते. पुलाअभावी १६ गावातील अनेक आजारी रुग्णांना, गर्भवती स्त्रियांना उपचाराअभावी आपले प्राण गमवावे लागले आहेत. अनेक अर्भकांनी हे जग न पाहताच मातेच्या गर्भातच आपला जीव सोडला आहे. या पुलाचे महत्व ज्यांचे नातेवाईक उपचाराअभावी मरण पावले आहेत. त्यांनाच समजू शकेल. निष्पाप आदिवासी बांधवांच्या खून करणाऱ्या नक्षलवादयांना त्यांची महती कदापि कळणार नाही. असे गावकऱ्यांनी म्हणत नक्षलवादाचा प्रतिकात्मक पुतळा तयार करुन त्याची होळी केली. यावेळी ग्रामस्थांनी 'नक्षलवाद मुर्दाबाद, नक्षलवादयांना नको विकास जाळपोळ करुन गाव केली भकास' तसेच किष्टापूर नाला झालाच पाहीजे अशा प्रकारच्या घोषणा देवून नक्षलवादयांचा जाहीर निषेध व्यक्त केला.

पंचक्रोशीतील आदिवासी बांधवांनी केलेल्या या निषेधात पुढे म्हटले की, किष्टापूर नाल्यावरील पुलाच्या रुपाने पंचक्रोशीतील आदिवासी जनतेच्या मनामध्ये एक आशेचा किरण दिसत असतांना नक्षलवादयांनी स्वत:ला अडचणीचा ठरणाऱ्या या पुलाच्या बांधकामावरील वाहनांची जाळपोळ करुन आपला नतदृष्ट हेतु साध्य केला आहे. परंतु आदिवासींच्या विकासामध्ये आडकाठी निर्माण करुन स्वत:चा फायदा पाहणारे नक्षलवादी यांच्या या क्रुरतेला आदिवासी बांधव कदापी सहन करणार नाही.

कोरोना-१९ विषाणुच्या फैलावाच्या पार्श्वभुमीवर गडचिरोली जिल्हयातील रस्त्यांची कामे बंद असून सर्व कंत्राटदारांना रस्त्यांच्या कामावरील वाहने सुरक्षीत ठिकाणी  ठेवण्यासाठी गडचिरोली पोलीस दलाकडून यापुर्वीच निर्देश देण्यात आलेले आहेत. कोरोना-१९ साथीचा फैलाव आटोक्यात आल्यानंतर पुन्हा रस्त्यांच्या बांधकामाला सुरवात केली जाणार आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे साो. यांनी देचलीपेठा पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे कौतुक केले असून ग्रामस्थांच्या मागणीनुसार कोरोना-१९ या रोगाची साथ संपल्यानंतर पुन्हा एकदा या पुलाच्या बांधकामाला सुरवात करु असे आश्वासन पंचक्रोशीतील नागरिकांना दिले आहे.





